**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**क्र.**
**ममाअ-७९/२०१९/प्र.क्र.७६६/फ-३**
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १२ डिसेंबर, २०१९

**प्रति,**

श्री. बंदा नागराज कुमार,
५०१/अ, निलकंठ आर्केड, सेक्टर-१७,
कोपर खैरने, जि. ठाणे ४०० ७०९.

**विषय:**- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपील अर्ज.
**श्री. बंदा नागराज कुमार यांचा दिनांक १७.०७.२०१९ चा प्रथम <u>ऑनलाईन अपील अर्ज.</u>**

श्री. बंदा नागराज कुमार यांच्या दिनांक १७.०७.२०१९ च्या प्रथम ऑनलाईन अपील अर्जावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक १२.१२.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

**स्थळ:- मुंबई.**
**दिनांक:- १२.१२.२०१९**

(वीरेन्द्र तिवारी) 12/12/19
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**
**तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**महसूल व वन विभाग**

**प्रतलिपी:-**

१) जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (फ-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) तथा प्रथम अपिलिय प्राधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कल १९ (१) अन्वये पारित केलेले आदेश**

************

**क्र. ममाअ-७९/२०१९/प्र.क्र.७६६/फ-३**
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १२ डिसेंबर, २०१९

**प्रति,**

| | | |
|---|---|---|
| श्री. बंदा नागराज कुमार,<br>५०१/अ, निलकंठ आर्केड, सेक्टर-१७,<br>कोपर खैरने, जि. ठाणे ४०० ७०९. | - | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| अवर सचिव तथा जनमाहिती अधिकारी फ-३<br>महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. | - | जनमाहिती अधिकारी |
| प्रथम ऑनलाईन अपिलाचा दिनांक | - | १७.०७.२०१९ |
| सुनावणीचा दिनांक | - | १२.१२.२०१९ |

श्री. बंदा नागराज कुमार, यांचा प्रथम ऑनलाईन अपील अर्ज दिनांक १७.०७.२०१९ रोजी या विभागामध्ये प्राप्त झाला. सदर अपिल अर्जास अनुसरुन दिनांक १२.१२.२०१९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत दिनांक ०४.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलकर्त्यास व जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (फ-३) यांना कळविण्यात आले. दिनांक १२.१२.२०१९ रोजी दुपारी ०३.०० वा. सुनावणीसाठी अपिलकर्ता व जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (फ-३) उपस्थित होते.

**२.** सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (फ-३) यांनी सांगितले की, अर्जदार श्री. बंदा नागराज कुमार यांचा माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त ऑनलाईन अर्ज दिनांक २९.०४.२०१९ च्या अनुषंगाने कार्यासनाने क्र. ममाअ-६२/२०१९/प्र.क्र.६९२/फ-३, दिनांक १०.०५.२०१९ अन्वये अपिलार्थी यांनी मागविलेली माहिती जन माहिती अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसून येते. सबब सदरचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रकरण २ मधील ६ (३) (दोन) अन्वये आवश्यक कार्यवाहीसाठी जन माहिती अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. प्रकरणानुषंगाने यापुढील पत्रव्यवहार जनमाहिती अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई यांचेकडे करावा, असे कळविले. माहितीचा अधिकार अर्ज व अपिल अर्जाच्या अनुषंगाने माहिती मिळावी अशी अपिलकर्ता यांनी अपेक्षा व्यक्त केली

Scanned by CamScanner

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

1) अपिलकर्त्याचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

2) अपिलकर्त्याने अपेक्षिलेली कांदळवन ऱ्हासाबाबतची माहिती ही वन जमिनी व्यतिरिक्त इतर शासकीय, निमशासकीय संस्थाच्या ताब्यातील जमिनीवरील कांदळवनांबाबत आहे. मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७.०९.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १६.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सागरतटीय जिल्ह्यांकरीता कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करण्याकरीता विभागीय आयुक्त कोकण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रन समिती गठीत केली आहे. अपिलकर्त्याने सदर समितीकडे पाठपुरावा करावा.

या आदेशासह अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ:- मुंबई.**
**दिनांक:- १२.१२.२०१९**

(वीरेन्द्र तिवारी) 12/12/19
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**
**तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**महसूल व वन विभाग**

Scanned by CamScanner